# प्रसिध्दी निवेदन

## राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा (NTS) इ. १० वी साठी २०२०-२१ राज्यस्तर परीक्षा दि. १३ डिसेंबर २०२०

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे- १ मार्फत राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा (NTS) इ. १० वी साठी राज्यस्तर परीक्षा रविवार दि. १३ डिसेंबर २०२० रोजी महाराष्ट्रात एकूण **३३७** केंद्रावर घेण्यात येणार आहे. सदर परीक्षेसाठी महाराष्ट्रातून एकूण **८८१९** शाळा व एकूण **९४२३८** विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यात आलेली आहे.

शाळांना परीक्षेसाठी प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे परिषदेच्या www.mscepune.in व http://nts.mscescholarshipexam.in या संकेतस्थळावर शाळा लॉगीनवर **दि. २३ नोव्हेंबर २०२०** पासून उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत.

सदर प्रवेशपत्रे विद्यार्थ्यांस काढून देण्याची जबाबदारी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांची असेल. प्रवेशपत्राबाबत मुख्याध्यापकांना/पालकांना/विद्यार्थ्यांना काही अडचणी असल्यास किंवा काही दुरस्ती असल्यास त्यांनी संबंधित परीक्षा केंद्रसंचालक / शिक्षणाधिकारी (माध्यमिक) / महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-१ यांचेशी संपर्क साधावा.

| कार्यालयाचा पत्ता | ईमेल | दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| मा. आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, १७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळाजवळ, पुणे- ४११ ००१. | nts.msce@gmail.com | ०२०-२६१२३०६६ / ०२०-२६१२३०६७ |

**(तुकाराम सुपे)**
**आयुक्त,**
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-१.

**दिनांक : २३/११/२०२०**